

गेल्या तीन वर्षांपासून लोकमत वृत्तपत्र समूह नागरिकांत आरोग्यविषयक जागृतीसाठी 'लोकमत महामॅरेथॉन'चे राज्यभरात आयोजन करीत आहे. 'आरोग्यासाठी धावा', असा मूलमंत्र घेऊन धावू लागलेली ही मॅरेथॉन आता महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत, मनामनांत रुजली आहे. धावणे हा सर्वांगसुंदर व्यायाम असून, कोणत्याही साधनाविना करता येणारा आहे. ज्याला आपल्या तनमनाची तंदुरुस्ती दीर्घकाळ टिकवायची आहे, उत्तरायुष्य समाधानाने, कोणत्याही व्याधीविना व्यतीत करावयाचे आहे, त्याने धावण्यासारखा व्यायाम दैनंदिन जीवनशैलीचा भाग बनवायला हवा. हाच संदेश रुजविण्यासाठी कोल्हापूरमध्ये ६ जानेवारी रोजी लोकमत महामॅरेथॉन होणार आहे. सुजाण आणि जागरूक कोल्हापूरकरांनी या मॅरेथॉनमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होऊन आरोग्याप्रती आपली सजगता व्यक्त करावी.

- **डॉ. देवानंद शिंदे**, कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 DEC 2018
महाराष्ट्र टाईम्स



अखिल भारतीय आंतरविद्यापीठ रगबी स्पर्धेतील विजेता शिवाजी विद्यापीठ संघातील खेळाडू.

# शिवाजी विद्यापीठाचे रगबी स्पर्धेत यश

**म. टा. प्रतिनिधी**, कोल्हापूर

अत्यंत लक्षवेधी ठरलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ रगबी स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघाने चंदीगड विद्यापीठाच्या मोहाली संघाचा २४ विरुद्ध ७ अशा गोलफरकाने दणदणीत पराभव करून स्पर्धेत अजिंक्यपदासह सुवर्णपदकाला गवसणी घातली. शिवाजी विद्यापीठाने सेव्हन साईड प्रकारात हे यश संपादन केले. फिफ्टीन साईड प्रकारात शिवाजी विद्यापीठाला मात्र उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. भुवनेश्वर (ओडिशा) येथील 'के.आय.आय.टी.' विद्यापीठात स्पर्धा पार पडली.

फिफ्टीन साईड प्रकारातील शिवाजी विद्यापीठाची लढत चंदीगड विद्यापीठ मोहाली संघाशी झाली. हा सामना मोहाली संघाने १२-८ असा जिंकला. स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या भरत चव्हाणला सामनावीर किताबाने गौरवण्यात आले. स्पर्धेत दीपराज राजेभोसले, केदार स्वामी, करणसिंह शिंदे, अनिकेत पाटील, प्रथमेश पाटील, करण फराकटे, अक्षय पाटील, मयुरेश अंगारे, कौस्तुभ नाईक, अक्षय मोळे यांनी बहारदार खेळ केला. संघाला प्रशिक्षक नीलेश पाटील, संघव्यवस्थापक दीपक पाटील आदींचे मार्गदर्शन लाभले.

**'सेव्हन ए साइडच्या विजेत्या संघातील खेळाडू:** कर्णधार श्रीधर निगडे, उपकर्णधार भरत चव्हाण, गोविंदगुप्त, सोमनाथ चव्हाण, ईश्वर कोटारकी, प्रशांत कांबळे, श्रीधर पाटील, विनायक पोवार, रविकिरण पाटील, तुषार पोवार, सुहास पाटील, ओमकार चोपडे आदींचा समावेश आहे.